
# समग्र मराठी वाङ्मयाचा संक्षिप्त इतिहास

प्रारंभ ते १९२० पर्यंत

(खंड पहिला)



डॉ. प्रशांत चौधरी

महाराष्ट्रातील सर्व विद्यापीठांच्या मराठी विषयाच्या बी.ए., एम.ए. करिता
तसेच सर्व प्रकारच्या स्पर्धा परीक्षांकरिता उपयुक्त

---

# समग्र मराठी वाङ्मयाचा संक्षिप्त इतिहास

(खंड पहिला)

**(आरंभ ते इ.स. १९२० पर्यंत)**


लेखक

**डॉ. प्रशांत गुणवंत चौधरी**

मराठी विभाग प्रमुख

व्यंकटेश महाजन महाविद्यालय, उस्मानाबाद

सहलेखन

**सौ. अपर्णा प्रशांत चौधरी-कुलकर्णी**



**विद्या बुक्स पब्लिशर्स**

औरंगपुरा, औरंगाबाद.

प्रकाशन क्रमांक - २७१

प्रथम आवृत्ती - १४ सप्टें. २०२०

© लेखक

**प्रकाशक**
शशिकांत पिंपळापुरे
विद्या बुक्स पब्लिशर्स
औरंगपुरा, औरंगाबाद.
फोन : (०२४०) २३३७३७१
email-aur.vidyabooks@gmail.com
website-www.vidyabooksabd.com

**अक्षरजुळणी**
सौ. अंजली डीटीपी सेंटर
शिवाजीनगर, औरंगाबाद
मो. ९१७५८३४१६६

**मुद्रक**
तन्मय ऑफसेट प्रिंटर्स
एमआयडीसी, चिकलठाणा,
औरंगाबाद

I.S.B.N. 978-93-81374-79-5

किंमत : ₹ ४००/-

# अनुक्रमणिका

**प्रकरण १-मराठी पूर्वपीठिका/ १ ते १४**

महाराष्ट्र आणि 'मरहट्ट', प्राचीन महाराष्ट्र आणि राजघराणी, मराठीचा पूर्वेतिहास, प्राचीन मराठी कोरीव लेख, प्राचीन महाराष्ट्रातील ग्रंथसंपदा

**प्रकरण २-प्राचीन महाराष्ट्रातील पंथ व संप्रदाय भाग-१/ १५ ते ६२**

प्रास्ताविक, नाथ संप्रदाय, महानुभाव पंथ, महानुभावांचे चरित्रग्रंथ, भागवत संप्रदाय (वारकरी संप्रदाय : स्वरूप आणि विशेष), श्री ज्ञानदेव, संत नामदेव, निवृत्तीनाथांची अभंगरचना, मुक्ताई, चांगदेव, गोरा कुंभार, विसोबा खेचर, परिसा भागवत, सावता माळी, नरहरी सोनार, जनाबाई, चोखामेळा, नामदेवांच्या कुटुंबातील संतकवी, सेना न्हावी, जगमित्र नागा, जोगा परमानंद, कान्हुपात्रा, बहिरा जातवेद, 'उखाहरण'कर्ता चोभा, मुकुंदराज

**प्रकरण ३-प्राचीन महाराष्ट्रातील पंथ व संप्रदाय भाग-२/ ६३ ते१०४**

पार्श्वभूमी, श्रीपादवल्लभ आणि नृसिंह सरस्वती, संत एकनाथ, नाथपंचक, मुक्तेश्वर, तुकाराम, तुकारामांची प्रभावळ, रामदास, रामदासांची प्रभावळ

**प्रकरण ४-पंडित काव्यपरंपरा/ १०५ ते १३१**

प्रस्तावना, वामन पंडित, नागेश, विठ्ठल बीडकर, ओंकार चोरमागे, देवदास, दत्तपदांकित मुकुंद, कवी मुकुंद, कवी काशि, शिवराम, तंजावर प्रांतातील कवी, सामराज, कृष्णदयार्णव, श्रीधर, सत्यमलनाथ, गैबीनाथ, गुप्तनाथ (गंगाबाई), उद्बोधनाथ, केसरीनाथ, शिवदिन केसरी, नरहरिनाथ, लक्ष्मण, महिपती, जगन्नाथ, शिवराम, मध्वमुनी, अमृतराय, नाभाजी, उद्धवचिद्घन, दासोदिगंबर, महिपतीबोवा ताहराबादकर, भीमस्वामी, राजाराम प्रासादी, नरहरी मालू, मोरोपंत

**प्रकरण ५-शाहिरी वाङ्मय/ १३२ ते १३९**

प्रस्तावना, पोवाडा : प्रेरणा व स्वरूप, लावणी, अनंत फंदी, होनाजी बाळा, राम जोशी, परशुराम, प्रभाकर, सगनभाऊ

**प्रकरण ६-बखर वाङ्मय/ १४०ते १५२**

प्रस्तावना, शिवपूर्वकालीन बखरी, चरित्रात्मक बखरी, आत्मचरित्रात्मक बखरी, सांप्रदायिक बखरी, कुलवृत्तांतात्मक बखरी, कैफियती, होळकरांची थैली, विशिष्ट कालखंडांच्या हकीकती

**प्रकरण ७-अव्वल इंग्रजी काळातील मराठी वाङ्मय/ १५३ ते १९४**

प्रस्तावना, कोश वाङ्मय, मराठीतील व्याकरणे, पाठ्यपुस्तकांची भाषांतरे, ख्रिस्तीधर्म प्रचारातून निर्माण झालेले वाङ्मय, नियतकालिक वाङ्मय, मासिके, निबंधमालापूर्व कथा-कादंबरी वाङ्मय, ऐतिहासिक कथा-कादंबरीकार व त्यांच्या कथा कादंबऱ्या, अन्य कादंबरीकार व त्यांच्या कादंबऱ्या, सामाजिक कादंबरी व 'यमुनापर्यटन', १८०० ते १८७४ या कालातील काव्य, अव्वल इंग्रजीतील प्रमुख कवी, सामाजिक सुधारणा व काव्य, अव्वल इंग्रजी कालातील नाट्यवाङ्मय, अव्वल इंग्रजी कालखंडातील पौराणिक नाटके, अव्वल इंग्रजीतील ऐतिहासिक नाटके, कल्पनारम्य नाटके, अव्वल इंग्रजीतील सामाजिक नाटके, अव्वल इंग्रजीतील निबंध - वाङ्मय

**प्रकरण ८-आधुनिक मराठी वाङ्मय/ १९५ ते २६१**

प्रास्ताविक, निबंधवाङ्मय, काव्य, कथा वाङ्मय, कादंबरी, नाटक, ऐतिहासिक वाङ्मय, चरित्रवाङ्मय, समीक्षा व साहित्यविचार, भाषा आणि व्याकरण.

**प्रश्नोत्तरे**

प्रकरण -१....२६२

प्रकरण -२....२८१

प्रकरण -३....३१६

प्रकरण -४....३२६

प्रकरण -५....३३१

प्रकरण -६....३३३

प्रकरण -७....३३६

प्रकरण -८....३४८

प्रकरण- १

# मराठीची पूर्वपीठिका

या प्रकरणात आपणास मराठी भाषेची तसेच 'महाराष्ट्र' या संज्ञेची वाटचाल थोडक्यात समजून घ्यावयाची आहे. सर्वप्रथम आपण 'महाराष्ट्र' या संज्ञेचा विचार करू.

इ. स. पूर्व पाच लक्ष वर्षांपासून महाराष्ट्रभूमीत मानवाचे वास्तव्य होते, असे प्रागैतिहासिक अभ्यासकांचे मत आहे. 'महाराष्ट्र' हा उल्लेख सर्वप्रथम इ. स.च्या चौथ्या शतकात सापडतो. मध्यप्रदेशातील सागर जिल्ह्यातील 'एरण' या गावी इ. स. ३६५ मध्ये सापडलेल्या स्तंभलेखात तत्कालीन राजा श्रीधर वर्मा याचा सेनापती सत्यनाग स्वत:स 'महाराष्ट्र' असे संबोधतो.

इ. स. ५०५ मधील वराहमिहिराच्या बृहत् संहितेतील दहाव्या अध्यायात 'महाराष्ट्र' हा शब्द आढळतो. ''महाराष्ट्र महाराष्ट्रदेशे जे जना निवसन्ति'', असा प्रदेशवाचक निर्देश बृहत् संहितेवरील भट्टोत्पलाच्या टीकेत आहे. सातव्या शतकातील दण्डीच्या 'काव्यदर्श' या ग्रंथात महाराष्ट्र आणि ती जेथे प्रचलित आहे तो महाराष्ट्र यांचा उल्लेख पुढीलप्रमाणे येतो.

*''महाराष्ट्रयां भाषां प्रकृष्ठ प्राकृतं बिंदु:*
*सागरं सुक्तित्नानां सेतुबन्धनादि यन्मयम् ।''*

जैनमुनी संघदासगणी यांनी 'बृहत् कल्पभाष्य' या ग्रंथात महाराष्ट्रातील कोल्लुक परंपरेचा उल्लेख केला आहे, तर संस्कृत कवी राजशेखरने (इ. स. ९००) अनेक वेळा महाराष्ट्राचा प्रदेशवाचक उल्लेख केला आहे.

### १.१ महाराष्ट्र आणि 'मरहट्ट' :

या प्रदेशास 'महाराष्ट्र' ही संज्ञा कशी प्राप्त झाली, याचे आणखी काही संदर्भ पुढीलप्रमाणे देता येतील.

डॉ. शं. बा. जोशी यांनी मरू (मर) अणि हट्टी असा शब्दसंयोग साधत 'मरहट्ट' असे शब्दरूप योजून त्याचा 'झाडीमंडळ' असा अर्थ दिला आहे. इ.

३. वि. का. राजवाडे, ४. ना. ना. खरे

प्र.१२२. कृ. अ. केळूसकर यांचा ग्रंथ कोणता?

१. शिवाजी महाराजांचे चरित्र, २. विचार मधुकरी,

३. आर्यांच्या चौदा विद्या, ४. वरीलपैकी नाही

प्र.१२३. 'आर्यांच्या चौदा विद्या'चे कर्ते कोण?

१. रा. र. भागवत, २. पां. ना. काणे,

३. शं. र. गोखले, ४. गो. शं. आपटे

प्र.१२४. ज. र. आजगावकर यांचा ग्रंथ कोणता?

१. मुलांचा महाराष्ट्र, २. भरतपुरचा वेढा,

३. काशीची करवत, ४. भारतीय श्रेष्ठत्व

प्र.१२५. 'डॉ. आनंदीबाई जोशी' यांचे चरित्र कोणी रचले?

१. ल. कृ. चिळूणकर, २. काशिबाई कानिटकर,

३. सी. के. दामले, ४. बा. म. हंस

प्र.१२६. 'बाळ गंगाधर टिळक यांचे चरित्र भाग १'चे कर्ते कोण?

१. कृ. आ. गुरुजी, २. सी. के. दामले,

३. शं. बा. मुजुमदार, ४. बा. म. हंस

प्र.१२७. 'मोरोपंत चरित्र' आणि 'काव्यविवेचन' हे ग्रंथ कोणी लिहिले?

१. बा. म. हंस, २. सी. के. दामले,

३. ल. रा. पांगरकर, ४. शं. बा. मुजुमदार

प्र.१२८. ना. सी. फडके यांनी लिहिलेले चरित्र कोणते?

१. एकनाथ चरित्र, २. दादाभाई नवरोजी यांचे चरित्र,

३. तुकाराम बोवा चरित्र, ४. वामन पंडित चरित्र

प्र.१२९. 'आमच्या आयुष्यातील काही आठवणी' हे आत्मचरित्र कोणाचे?

१. आनंदीबाई जोशी, २. रमाबाई रानडे,

३. ना. वा. गुणाजी, ४. श्री. स. गोखले

●

'समग्र मराठी वाङ्मयाचा संक्षिप्त इतिहास–खंड पहिला' हा ग्रंथ विशिष्ट हेतू समोर ठेवून निर्माण केला आहे. मराठी वाङ्मयाच्या इतिहासलेखनाचे जे जे प्रयत्न आजवर झाले आहेत, त्यांना समोर ठेवून हे विहंगमावलोकन करण्याचा प्रयत्न केला आहे.

प्रस्तुत खंडात मराठीच्या भाषा म्हणून असणाऱ्या पूर्वपीठिकेपासून १९२० पर्यंतचा वाङ्मयीन इतिहास नजरेसमोर ठेवला आहे. मराठीची पूर्वपीठिका, प्राकृत व अपभ्रंशातील वाङ्मयरचना, प्राचीन व मध्ययुगीन काळातील विभिन्न साहित्यप्रवाह, अव्वल इंग्रजी काळातील वाङ्मयाचे स्वरूप व आधुनिक मराठी वाङ्मयाची पार्श्वभूमी इथपर्यंतच्या वाङ्मयीन घडामोडींचे कथन या ग्रंथात संक्षेपाने केले आहे.

विभिन्न स्पर्धा परीक्षा, तसेच पदवी व पदव्युत्तर वर्गातील अभ्यासक व शिक्षक यांना उपयुक्त ठरावी अशी या ग्रंथाची आखणी केली आहे. या दृष्टीने या ग्रंथात दिलेला वस्तुनिष्ठ बहुपर्यायी प्रश्नसंच विद्यार्थ्यांसाठी खूपच उपयुक्त ठरेल.

या प्रश्नसंचाची आखणी करताना एम.पी.एस.सी., यू.पी.एस.सी. आणि सेट-नेटसारख्या स्पर्धा परीक्षांसोबतच वेगवेगळ्या परीक्षांसाठी विचारल्या जाणाऱ्या प्रश्नांचे प्रारूप समोर ठेवले आहे.

प्रस्तुत खंडात मराठी साहित्याच्या १९२० पर्यंतच्या वाटचालीचा आढावा घेतला आहे. येथून पुढील २०२० पर्यंतच्या वाङ्मयाचा असाच आढावा पुढील खंडात घेतला जाणार असून लवकरच हाही खंड आम्ही प्रकाशित करीत आहोत. साहित्याच्या निरनिराळ्या प्रवाहांसोबत विविध वाङ्मयीन घडामोडी, स्पर्धा परीक्षांसाठी उपयुक्त माहिती, महत्त्वाच्या नोंदी व बहुपर्यायी वस्तुनिष्ठ प्रश्नसंच अशा अनेकविध परिशिष्टांच्या समावेशामुळे हा दुसरा खंडही वाचक व अभ्यासक यांना उपयुक्त ठरेल, याची आम्हाला खात्री आहे.

ISBN NO